# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ३०/०९/२०२५ ( मंगळवार )**

## प्रतिबंधीत सुगंधित तंबाखुची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन केळवद**:— दिनांक ३०/०९/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदारा कडुन माहिती मिळाली की, पोलीस स्टेशन केळवद हद्दीतुन पांढुर्णा कडुन नागपुर कडे लाल रंगाच्या वॉगनार कार मध्ये प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखुची वाहतुक केली जाणार आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी भागेमाहेरी टोल नाका येथे नाकाबंदी केली असता पाढुर्णा कडुन लाल रंगाची मारूती सुझुकी वॉगनार कार क्रमांक एम.एच—०१ व्ही. ए. ५७२९ येतांना दिसली. सदर वाहन थांबवुन पंचासमक्ष वाहनाची पाहणी केली असता वाहनामध्ये महाराष्ट्र राज्यात बंदी असलेला सुगधीत तंबाखु मिळुन आाला. वाहन चालक आरोपी नामे मोहम्मद आमीन मोहम्मद शमी पठाण, वय २१ वर्ष, रा. आझाद वार्ड छोटी माजिद जवळ, मुलताई ता. मुलताई, जि. बैतुल, राज्य मध्य प्रदेश याचे ताब्यातुन सात वेगवेगळया कंपनीचे सुगंधीत तंबाखु आणि पान मसाला एकुण वनज ३४४ . ११ किलोग्रॅम किंमती २,६४,८६८/—रूपये, चारचाकी वाहन मारूती सुझुकी वॉगनार क्र एम.एच—०१ व्ही. ए. ५७२९ किंमती ३,००,०००/—रूपये आणि एक अॅड्रॉईड मोबाईल असा असा एकुण ५,९४,८६८ /—रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

नमुद आरोपीविरूद्ध पोस्टे केळवद येथेभारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम १२३, २७४, २७५, २२३ सह कलम अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे.



## जनावर चोरीचा गुन्हा उघड, ५ आरोपी अटक ,
## भिवापुर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन भिवापुर :–** तक्रारदार नामे रामदास शिवराव लुचे, वय ४८ वर्ष राहणार कोष्टीपुरा, भिवापूर, ता. भिवापुर , जि. नागपूर यांनी तक्रार दिली की, दिनांक १२/०९/२०२५ चे रात्री १०/००वा ते दिनांक १३/०९/२०२५ चे सकाळी ०६/०० वा दरम्यान फिर्यादी यांनी त्यांच्या घराच्या बाजूला खुल्या जागेतील गोठ्यामध्ये म्हशी बांधून ठेवलेल्या होत्या कोणीतरी अज्ञात चोराटयांनी २ म्हशी चोरी केल्याचे फिर्यादीच्या तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भिवापुर येथे अप.क्र. ६३७/२०२५ कलम ३०३(२) भारतीय न्याय संहीता अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

मा. वरीष्ठ पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनात भिवापुर पोलीसांनी नमुद गुन्हा उघडकीस आणण्यासाठी पथक तयार केले. नमुद पोलीस पथकाने गुप्तबातमीदार आणि तांत्रिक पुराव्याच्या अधारे दिनांक ३०/०९/२०२५ रोजी आरोपी नामे १) समीर तुलसीदास शेंडे, वय २३ वर्ष, रा. दिघोरा, ता. भिवापुर,जि.नागपूर ,२) सुकेशनु सावसागडे, वय २१ वर्ष, रा.दिघोरा, ता. भिवापुर,जि.नागपूर,३) मनीष रोहनकर, वय १९ वर्ष, रा. अहिल्याबाई होळकर चौक, भिवापूर ४) यश वानखेडे, वय १९ वर्षे, रा. चर्चच्या पाठीमागे, दिघोरा

,भिवापूर ५) अमोल देशमुख वय २८ वर्ष, रा. अड्याळ, ता.भिवापूर जिल्हा नागपूर यांना ताब्यात घेवुन त्यांची चौकशी केली असता त्यांनी नमुद गुन्हा केल्याची कबुली दिली.

पोलीसांनी आरोपीतांच्या ताब्यातुन म्हशी चोरी करण्यासाठी गुन्हयात वापरलेले मोटर सायकल हिरो स्प्लेंडर क्रमांक एम.एच ४० डी ए १०७० किंमती ३०,००० /—रुपये , पिकअप क्रमांक एम.एच ३० वाय ४६३० किंमती २,००,०००/— रुपये असा एकूण २,३०,०००/— रुपयांचा माल पंचासमक्ष जप्त केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असुन पुढील तपास भिवापुर पोलीस करीत आहे.




# पोलीस स्टेशन कळमेश्वर अंतर्गत अंमली पदार्थावर केलेल्या कारवाई बाबत

दिनांक ३०/०९/२०२५ चे एका वृत्तपत्रात एमडी प्रकरणानंतरही पुरवठादार निर्धास्त, पोलीसांच धाक नाही ! अशा मथळयाखाली बातमी प्रसीध्दी झाली आहे. सदर प्रकरणाची सविस्तर माहिती अशी आहे की, दिनांक ०८/०९/२०२५ रोजी कळमेश्वर पोलीसांना गुप्तबातमीदारा मार्फतीने एम.डी अंमली पदार्था बाबत मिळालेल्या खबरेवरून कळमेश्वर पोलीसांनी पुरूषोत्तम लॉज येथे छापा टाकुन आरोपी नामे **१) सचिन पुरूषोत्तम रोकडे, वय ३५ वर्ष,रा. एमआयडीसी चौक २) मोहम्मद नियाज अंसारी, वय ३३ वर्ष,रा. नवी बस्ती टेकानाका नागपुर यांच्या ताब्यातुन** एकुण १.७०ग्रॅम अंमली पदार्थ एम.डी. आणि एक ॲड्रॉईड मोबाईल असा एकुण ४५,५०० /— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला होता. आरोपीतांविरूध्द एनडीपीएस कायदयान्वये गुन्हा नोंद करून त्यांना अटक करण्यात आली होती. सदर गुन्हयाचे तपासादरम्यान दोन्ही आरोपीतांना पोलीस कोठडी दरम्यान विचारपुस केली असता त्यांनी **३) प्रज्वल सराटकर रा. नागपुर** याचे कडुन एम.डी. अंमली पदार्थ घेतलेले असल्याचे सांगीतले. तसेच आरोपी नामे **४) अंनता गिरधर बालपांडे, रा. नागपुर** याला सुध्दा एम.डी विकत घेवुन सेवन केल्यामुळे सदर गुन्हयात अटक करण्यात आली. पोलीसांनी सदर गुन्हयात साखळी पुरावे जोडत यातील पुरवठादार आरोपी नामे आरोपी प्रज्वल विष्णूजी सराटकर याला त्याचे राहते घर क्रं. ४५१ प्रेम नगर दहीबाजार नागपूर येथुन ताब्यात घेतले असता त्याच्या घरझडतीमध्ये एम.डी अमंली पदार्थ एकूण १०.३३ ग्रॅम किमंती ४८,००० रू. चा मुद्देमाल मिळुन आला. गुप्त बातमीदार तसेच तांत्रिक रित्या तपास करीत दिनांक १७/०९/२०२५ रोजी नमुद गुन्हयातील **अंमली पदार्थ पुरवाठादार आरोपी ५) संकेत अजय बुग्गेवार, रा. नागपूर** याचा स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांच्या पथकाने शोध घेवुन त्याला अटक केली. तसेच आरोपी नामे संकेत अजय बुग्गेवार याचे पोलीस ठाणे गणेशपेठ नागपूर शहर येथे एन.डी.पी.एस कायदयाअन्वये गुन्हा नोंद असल्याचे दिसुन आले. नमुद गुन्हयात कळमेश्वर पोलीस तसेच स्थानिक गुन्हे शाखा हे साखळी पुरावे जोडुन मा. वरीष्ठ पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनात तपास करीत आहे.

# नरखेड शहरातील बस स्थानक ते ऋषीश्वर मार्गावर स्ट्रीट लाईट सुरू असल्याबाबत

दिनांक २९/०९/२०२५ चे एका वृत्तपत्रात बसस्थानक ते ऋषीवर मार्गावर अंधाराचे साम्राज्य अशा मथळयाखाली बातमी प्रसीध्दी झाली आहे. सदर प्रकरणाची सविस्तर माहिती अशी आहे की, दिनांक २७/०९/२०२५ रोजी नरखेड शहरातील बस स्थानक ते ऋषीश्वर मार्गावर स्ट्रीट लाईट ला सप्लाय होणारी इलेक्ट्रिक वायर शॉर्टसर्किट मुळे जळाल्याने स्ट्रीट लाईट बंद झाले होते. दिनांक २८/०९/२०२५ रोजी एम.एस.ई.बी विभाग नरखेड यांनी सदरची इलेक्ट्रिक वायर दुरुस्त केली असून नरखेड शहरातील बस स्थानक ते ऋषीश्वर मार्गावर स्ट्रीट लाईट सुरळीत सुरू आहे.



# नागपुर ग्रामीण जिल्हयातील ६४६ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक ३०/०९/२०२५ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २१ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ६४६ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बोरी येथे ३१ आरोपी , ,पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३३ आरोपी अशा एकुण ९४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ३१ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे २९ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २६ आणि पोलीस स्टेशन वेलतुर २६ आरोपी अशा एकुण ११२ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ३१ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे २६ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३२ आरोपी अशा एकुण ११९ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३४ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे २६ आरोपी अशा एकुण ६० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ३० आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३२ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे २१ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे येथे २७ आरोपी अशा एकुण ११० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ४१ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे ३२ आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ४६ आरोपी

आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ३२ आरोपी अशा एकुण १५१ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सर्व ६ उपविभागातील सर्व २१ पोलीस स्टेशन येथे एकुण ६४६ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**



## रात्र गस्त दरम्यान कोबींग ऑपरेशन राबवुन केले रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक आणि नाकाबंदी करून तपासली वाहने

दिनांक २९/०९/२०२५ चे २३:०० वा. ते दिनांक ३०/०९/२०२५ चे ०५:०० वा. दरम्यान जिल्हा गस्त मध्ये श्री सागर खर्डे, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर विभाग यांनी संपुर्ण जिल्हयात सतर्कपणे गस्त केली. तसेच पोलीस स्टेशन कळमेश्वर अंतर्गत कळमेश्वर टाउन व एम.आय.डी.सी., सेलू, ब्राम्हणी, इदिरा नगर, माता पुरा, हुडको कॉलनी येथे पायदळ पेट्रोलींग करून कोबींग ऑपरेशन

राबविण्यात आले. तसेच ब्राह्मनी फाटा चौक, शिवाजी चौक,  मटण मार्केट (बाजार चौक ) येथे नाकाबंदी करण्यात आली.

सदर कोबिंग ऑपरेशन आणि नाकाबंदी श्री सागर खर्डे यांच्या नेतृत्वात राबविण्यात आले असुन रेकॉर्डवरील गुन्हेगार, जेल रिलीज गुन्हेगार, निगराणी बदमाश तसेच अवैध दारू विक्रेते गुन्हेगार चेक करून त्यांचे घराची पंचासमक्ष घरझडती घेण्यात आली.नाकाबंदी दरम्यान संशयीत वाहनांची तपासणी करण्यात आली आहे.



मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने